जनसामान्यांच्या मनातील आरसा
वरुड दर्पण
संपादक - चंद्रकांत भा. भड
Postal Lic./AMT/RNP/492/2026-28
वरुड | शनिवार
११.०४.२०२६
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485
वर्ष: ०७ | अंक: ७० | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
+91 7745067712

## थोडक्यात

### स्लीपर वंदे भारत ट्रेनला रेल्वे मंत्रालयाची मंजुरी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई**- मुंबई आणि बंगळुरूदरम्यान रेल्वे प्रवास अधिक वेगवान व आरामदायी करण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलण्यात आले आहे. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या मार्गावर 'स्लीपर वंदे भारत' ट्रेन सुरू करण्यास मंजुरी दिली आहे. ही नवी स्लीपर ट्रेन छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते केएसआर बंगळुरू दरम्यान धावणार असल्याची माहिती रेल्वे मंत्रालयाच्या अधिकृत पत्रातून समोर आली आहे. प्रवासी सुविधांबाबत झालेल्या चर्चेनंतर हा निर्णय घेण्यात आला. लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी विशेष डिझाइन सध्या धावणाऱ्या वंदे भारत ट्रेन प्रामुख्याने चेअर कार स्वरूपात असतात.


# परभणी, नांदेड भुकंपाच्या धक्क्यांनी हादरलं

## घरावरचे पत्रे हलले, नागरिकांमध्ये घबराहट

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**परभणी/नांदेड** - राज्यातील विदर्भ आणि मराठवाड्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. परभणी, नांदेड हिंगोली, वाशिमसह यवतमाळमध्ये भूकंपाचे सौम्य धक्के बसल्याची माहिती आहे. तर काही ठिकाणी भूकंपाची तीव्रता जास्त असल्याने घरांच्या भिंतींना तडे गेले असून घरावरील पत्रे हलल्याचीही घटना घडली आहे. अचानक सौम्य धक्के जाणवल्याने नागरिकांमध्ये भीतीच वातावरण पसरलं असून अंदाजे ८ वाजून ४६ मिनिटांनी हा धक्का जाणवल्याची प्राथमिक माहिती आहे.

घरामध्ये ठेवलेली भांडी आणि वस्तू जमिनीवर कोसळून पडले, अनेकांच्या घराला तडे हिंगोली जिल्ह्यांमध्ये आज सकाळी आठ वाजून ४७



मिनिटांच्या सुमारास भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले आहेत. हिंगोली जिल्ह्यांमध्ये दरवेळेस भूकंपाचे धक्के जाणवत असतात. मात्र यावेळेसचा भूकंपाचा धक्का हा मोठ्या प्रमाणात असल्याचं नागरिक सांगत आहेत. भूकंपाचा धक्का जाणवल्यानंतर अनेक गावातील घरामध्ये ठेवलेली भांडी आणि वस्तू जमिनीवर कोसळून पडले आहेत. तर अनेकांच्या घराला तडे गेल्याची सुद्धा प्राथमिक माहिती समोर आली आहे. हा भूकंपाचा धक्का हिंगोली जिल्ह्यासह नांदेड, परभणी या जिल्ह्यांना सुद्धा मोठ्या प्रमाणात जाणवलेला आहे.

४.७ रिश्टर स्केलच्या भूकंपाची नोंद हिंगोली जिल्ह्यातील संपूर्ण गावांना या भूकंपाच्या धक्के जाणवल्याची माहिती असून अद्याप पर्यंत कोणतीही जीवित हानी झाल्याची माहिती समोर आली नाही. मात्र भूकंपानंतर भयभीत झालेले नागरिक तत्काळ घराच्या बाहेर आले होते. तरी नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असा आव्हान प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेला आहे. या भूकंपाचे अद्याप प्रशासन स्तरावर कोणतीही नोंद झाली नसली तरी प्रशासनाच्या वतीने या भूकंपाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला जातोय. भूकंपाचे केंद्रबिंदू पांगरा शिंदे गाव भूकंपाची नोंद झाली असून ४.७ रिश्टर स्केलचा हा भूकंप झाला आहे.

भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यात असल्याची माहिती दुसरीकडे, नांदेडमध्ये देखील भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले आहे. शहरातील सिडको, वजीराबाद, आनंद नगर, तरोडा सांगावी भागात हे धक्के प्रकर्षाने जाणवले आहेत. मिलेल्या माहितीनुसार, ४.७ रिस्टर स्केलचा हा भूकंप असल्याची माहिती आहे.

# २३ वर्षांची प्रतीक्षा संपली! महिला व बाल विकास विभागात ८,६६९ पदांची मेगाभरती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्य शासनाच्या महिला आणि बाल विकास विभागात तब्बल दोन दशकांनंतर भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे. गेल्या २३ वर्षांपासून प्रलंबित असलेला पदभरतीचा प्रश्न मार्गी लावत, सरकारने ८ हजार ६६९ नियमित पदे भरण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे विभागाच्या सक्षमीकरणाला नवी दिशा मिळणार असून कामकाजाचा वेग वाढणार आहे. महिला आणि बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी या निर्णयाची माहिती दिली असून, या मेगाभरतीमुळे विभागाचा चेहरामोहरा बदलणार असल्याचे त्यांनी सांगितले. विभागाने कामकाजाच्या सोयीसाठी विभागाची मोठी पुनर्रचना केली आहे. कालबाह्य झालेली जुनी पदे रद्द करून



त्याऐवजी आधुनिक कामकाजासाठी आवश्यक अशी १६५ नवीन पदे निर्माण करण्यात आली आहेत. या फेररचनेनंतर विभागातील एकूण मंजूर पदांची संख्या आता ८,६६९ झाली आहे. विशेष म्हणजे, दैनंदिन कामकाजात गती आणण्यासाठी नियमित पदांसोबतच २ हजार ८४३ पदे बाह्ययंत्रणे मार्फत (आउटसोर्सिंग) भरण्याच्या प्रस्तावालाही प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे.

अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांसाठी मोठा निर्णय ग्रामीण आणि दुर्गम भागातील बालकांचे पोषण तसेच आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी राज्य सरकारने एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत मोठा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. यामध्ये १ लाख १० हजार ६६४ अंगणवाडी सेविका आणि तितक्याच संख्येने मदतनीस पदांचा समावेश आहे. सरकारच्या या निर्णयामुळे गावपातळीवरील आरोग्य योजनांच्या अंमलबजावणीला मोठी गती मिळणार असून, अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या बळावर कुपोषणमुक्तीच्या लढाईला नवे बळ मिळणार आहे.

महिला व बालकल्याण योजनांचा मार्ग मोकळा विभागाच्या बळकटीकरणासाठी घेतलेला हा निर्णय महिला आणि बालकांच्या विकासासाठी मैलाचा दगड ठरेल,' असा विश्वास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला आहे.

# अंजनगाव पुतळा प्रकरणात पोलिसांची कारवाई, शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी ६ आरोपींना अटक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**सोलापूर** – माढा तालुक्यातील अंजनगाव पुतळा प्रकरणात पोलिसांनी आणखी एक मोठी कारवाई केली आहे. अंजनगावला पुतळा पाठवणाऱ्या बाळराजे आवारेचा जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील कारखाना पोलिसांनी सील केला होता. तसेच या प्रकरणात आतापर्यंत आठ गुन्हे दाखल असल्याची माहिती आहे. तर आता या प्रकरणी ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. माढा तालुक्यातील अंजनगाव पुतळा प्रकरणात शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी ६ आरोपींना अटक करण्यात आल्याची माहिती आहे.

दरम्यान, अंजनगाव येथे जमिनीची मोजणी करण्यासाठी आलेल्या अधिकाऱ्यांना कामात अडथळा आणल्याप्रकरणी हि अटक करण्यात आली आहे. ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या विरोधात हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील हाके यांचे सहकारी शिवम वाघमोडे, बाळू वाघमोडे, सतीश वाघमोडे, बंडू वाघमोडे, अरुण वाघमोडे, नितीन वाघमोडे यांना पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी अटक केलेले सर्व आरोपी हे अंजनगाव येथील



स्थानिक ग्रामस्थ आहेत, अशी देखील माहिती आहे.

शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी ६ आरोपींना अटक दरम्यान, पोलिसांवर दगडफेक केल्याप्रकरणी या आधीच १२ आरोपीना पोलिसांनी अटक केली असून त्यातील १० जण अजूनही न्यायालयीन कोठडीत आहेत. मौजे अंजनगाव तालुका माढा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसवल्याप्रकरणी दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी पासून गावामध्ये तणाव निर्माण झाला होता. गावातील दोन्ही समाज एकमेकांसमोर आंदोलनाकरिता बसले होते. अशावेळी प्रशासनाने जागेची मोजणी करून घेण्याबाबत समन्वयाने तोडगा काढला होता. परंतु मोजणी करताना मोजणी अधिकारी यांच्या कामात हस्तक्षेप करून कामात अडथळा आणल्या प्रकरणी आरोपींना अटक करण्यात आली आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे शिवम भारत वाघमोडे वय -२७ रा. अंजनगाव ता.माढा जि- सोलापूर बाळू नवनाथ वाघमोडे वय- ३१ रा.अंजनगाव ता.माढा जि- सोलापूर. सतीश हनुमंत वाघमोडे वय- २५ रा.अंजनगाव ता.माढा जि- सोलापूर. बंडू दिगंबर वाघमोडे वय - ३५ रा.अंजनगाव ता.माढा जि- सोलापूर. अरुण सुभाष वाघमोडे वय ३२ रा.अंजनगाव ता.माढा जिल.सोलापूर.

विनापरवाना पुतळा उभारल्यास एफआयआर दाखल होणार, चार तासांत पुतळा हटवणार सोलापूर जिल्ह्यात विनापरवाना पुतळा उभारल्यास थेट एफआयआर दाखल करून ४ तासात पुतळा हटवणार, असा मोठा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे. यासह विनापरवाना उभारण्यात आलेल्या पुतळ्याची माहिती लपवल्यास सात दिवसात पो-लीस पाटलाचे निलंबन देखील होणार असल्याची माहिती आहे.

## इंद्रलोक झोपडपट्टीत भीषण आग

# 3 जणांचा मृत्यू, 30 हून अधिक झोपड्या जळून खाक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मिरा-भाईंदर परिसरातील नवघर येथील इंद्रलोक झोपडपट्टीत शुक्रवारी (दि.१०) रात्री लागलेल्या भीषण आगीत तीन जणांचा होरपळून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. झोपड्यांमध्ये लागलेल्या आगीने क्षणार्धात विक्राळ रूप धारण केल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. आग कशी लागली? पीटीआय वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी



रात्री सुमारे ८.३० वाजण्याच्या सुमारास ही आग लागली. मिरा-भाईंदर महापालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी प्रकाश बोराडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, नवघर येथील इंद्रलोक झोपडपट्टी भागात आग लागल्यानंतर काही क्षणातच ती झपाट्याने पसरली. गवत, कापड आणि तात्पुरत्या साहित्यापासून बनलेल्या झोपड्यांमुळे आग वेगाने पसरत गेली. आगीच्या ज्वाळा दूरवरूनही दिसत होत्या. ३० ते ३५ झोपड्या जळून खाक या आगीत सुमारे ३० ते ३५ झोपड्या पूर्णपणे जळून खाक झाल्या. आगीदरम्यान अनेक एलपीजी सिलिंडरचा स्फोट झाला, ज्यामुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली. अग्निशमन दलाने घटनास्थळावरून २४ सिलिंडर सुरक्षितपणे बाहेर काढले, त्यापैकी काही भरलेले तर काही रिकामे होते. तासभराच्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात अग्निशमन दलाने जवळपास एका तासाच्या अथक प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणली. मात्र, तोपर्यंत मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं होतं. ३ जणांचा होरपळून मृत्यू या भीषण आगीत तीन जणांचा होरपळून मृत्यू झाला असून, त्यांचे मृतदेह ओळखू न येण्याइतके जळाले होते. मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. दरम्यान, आगीचं नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नसून, याबाबत पुढील तपास सुरू आहे.



# एमटीएनएल, बीएसएनएलच्या जागांवर होणार परवडणारी घरे : ‘रेडीरेकनर’नुसार जागा घेण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – एकेकाळी मुंबईची संवाद वाहिनी असलेल्या आणि आता डबघाईला आलेल्या ‘एमटीएनएल’ आणि ‘बीएसएनएल’च्या जागांवर पंतप्रधान आवास योजनेंतर्गत परवडणारी घरे बांधली जाणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारच्या बैठकीत ‘एमटीएनएल’ आणि ‘बीएसएनएल’च्या मालकीची आरक्षित जागा रेडीरेकनर दरानुसार घेण्यास मान्यता दिली.

त्यामुळे जागा ताब्यात आल्यानंतर मुंबईतील ‘एमटीएनएल’, ‘बीएसएनएल’च्या जागेवरील हा पहिलाच गृह प्रकल्प असणार आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळाची बैठक शुक्रवारी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ‘सह्याद्री’ अतिथीगृह येथे पार पडली.

या बैठकीत बोरिवली येथील ‘बीएसएनएल’च्या मालकीची, तर शिंपोली येथे ‘एमटीएनएल’ची जागा असून दोन्हीची मिळून एकूण २८.८४ एकर जागा आरक्षित आहे. ही आरक्षित जागा रेडीरेकनर दरानुसार ७२९ कोटी रुपयांना घेऊन या आरक्षित जागेवर प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरांचा प्रकल्प राबविण्यास तसेच उर्वरित आरक्षित जागा विकसित करण्याचा प्रस्ताव महामंडळाने बैठकीत ठेवला होता. या प्रस्तावास मुख्यमंत्री फडणवीस यांनी मान्यता दिली.

### डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या ६१ व्या पुण्यतिथी निमित्त

# महात्मा फुले महाविद्यालयात विशेष व्याख्यान

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय येथे डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या ६१ व्या पुण्यतिथी निमित्त समता पर्व सप्ताहातील पहिले पुष्प महाविद्यालयाच्या डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहात संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.दिलीप हांडे, प्रमुख उपस्थितीत विकास ठाकरे, अशोक काळामेघ, प्रमुख वक्ते डॉ.चत्रभुज कदम, कनिष्ठ महाविद्यालय पर्यवेक्षिका अल्का पवार, पालक प्रतिनिधी वनिता चौधरी, डॉ.सुनील कोंडुलकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालय परिसरातील डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास व सभागृहात क्रांतीसुर्य महात्मा फुले व डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पुजन व पुष्पहाअर्पण केले.

नंतर डॉ.पंजाबराव देशमुख गौरव गीताने समारंभाची सुरुवात झाली. प्रास्ताविकातुन मराठी विभागातील प्रा.लक्ष्मण पवार यांनी समता पर्वातील उद्दिष्ट सांगुन थोर महामानवांचे विचार आपल्या अंगी रुजावेत असे म्हटले.

प्रमुख अतिथी विकास ठाकरे यांनी डॉ.पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक व सामाजिक कार्य विशद केले. प्रमुख वक्ते डॉ.चत्रभुज कदम यांनी डॉ.पंजाबराव देशमुख युवकांचे प्रेरणास्थान’ त्या विषयाची मांडणी करतांना डॉ.पंजाबराव देशमुख एक भारतीय जिनियस आहेत, असे म्हटले. डॉ.दिलीप हांडे यांनी समता पर्वाची सुरुवात अतिशय दमदारपणे सुरु झाली असून श्री शिवाजी शिक्षण संस्था, डॉ.पंजाबरावांचे विचार संपुर्ण महाराष्ट्रभर पोहोचवण्याचे कार्य करत आहे. या महामानवांच्या विचारातुन समाज परिवर्तन अपेक्षित आहे, असे म्हटले.

संचालन वैशाली गेडेकर तर उपस्थितांचे आभार प्रवीण नंदेश्वर यांनी मानले. यावेळी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद, वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजुरा बाजार मार्गावरील झाडांची त्वरीत छाटणी करा

### राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी तर्फे तहसिलदारांना निवेदन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – वरुड ते राजुरा बाजार मुख्य रस्त्यावरील अपघातास कारणीभूत होणाऱ्या वाळलेले, वाकलेले, जीर्ण झालेले झाडे त्वरीत छाटण्यात यावे, अशी मागणी करणारे निवेदन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी तर्फे तहसिलदार यांना देण्यात आले आहे.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, वरुड ते राजुरा बाजार मुख्य रस्त्यावरील अपघात टाळण्यासाठी रस्त्यावरील झाडांची छाटणी करावी जेणेकरुन रस्ते अपघात कमी होऊन जीवीतहाणी होणार नाही. राजुरा येथे मोठी बाजारपेठ आहे तसेच बैल बाजार, शेतमाल आणि इतर वस्तुची खरेदी विक्री अनेक वर्षांपासून होत आहे. या निमोत्ताने शेतकरी आणि नागरिकांची नेहमीच वदर्ळ सुरु असते. काही दिवसांपासून सदर रसत्यांवरील झाडे खूप जास्त वाढलेले असल्यामुळे अनेक ‘अपघात झालेले आहे. त्यातुन काही नागरिकांस आपले प्राण सुध्दा गमवावे लागले आहे तर काही गंभीर रित्या जखमी सुध्दा झालेले आहे. आपण सदर्हु बाबींची गंभीर दखल घेण्यास दिरंगाई केल्यास यापुढे सुध्दा गंभीर स्वरुपाचे अपघात होण्याची दाट शक्यता आहे.

दुसरी बाब म्हणजे याच मुख्य रस्त्यावर रेल्वे मार्गाचे उड्डाणपुलाचे सुध्दा काम अत्यंत सुथ गतीने सुरु असल्यामुळे ते सुध्दा अपघातास निमंत्रण देत आहे. उपरोक्त दोन्ही बाबींवर आपण संबंधीतांकडुन कार्यवाही करुन नागरिकांची जीवीत हाणीपासून वाचवावे, जेणेकरुन प्रशासनाच्या दुर्लक्षीपणामुळे विनाकारण बळी जाणार नाही, याची काळजी घ्यावी. अन्यथा प्रशासनाच्या विरोधात जनता रस्त्यावर उतरेल, असा इशारा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे युवक तालुकाध्यक्ष निलेश गोमकाळे, निलेश साबळे, जसमतसिंग भावे, जगदिश सोनुले, जगबिर सिंग भावे यांनी एका निवेदनाव्दारे तहसिलदारांना दिला आहे.

# भाजप सत्तेत आल्यास ६ महिन्यांत यूसीसी लागू करु पश्चिम बंगालमध्ये अमित शहा यांची घोषणा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**कोलकाता** :- पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शुक्रवारी भाजपचा जाहीरनामा (संकल्प पत्र) प्रसिद्ध केला.

यावेळी त्यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल कॉंग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला. भाजप सत्तेत आल्यास पहिल्या सहा महिन्यांत राज्यात ’समान नागरी कायदा’ (यूसीसी) लागू केला जाईल, अशी मोठी घोषणा शहा यांनी यावेळी केली.

बंगाली मुख्यमंत्रीच होणार गेल्या अनेक दिवसांपासून भाजपचा मुख्यमंत्री पदाचा चेहरा कोण असेल, या चर्चेवर शहा यांनी पडदा टाकला. ते म्हणाले, भाजप हा घराणेशाही चालवणारा पक्ष नाही, जेथे आत्यानंतर पुतण्या गादीवर बसेल. मी बंगालच्या जनतेला आश्वासन देतो की, भाजपचा मुख्यमंत्री हा बंगालचा सुपुत्र आणि येथीलच नागरिक असेल.

व्हिडीओ वादावर स्पष्टीकरण तृणमूलने प्रसिद्ध केलेल्या हुमायूं कबीर यांच्या व्हिडीओंवर शहा म्हणाले की, कबीर आणि भाजप हे दोन विरुद्ध ध्रुव आहेत. अशा लोकांशी हातमिळवणी करण्यापेक्षा आम्ही विरोधी बाकावर बसणे पसंत करू. ममता बॅनर्जी अशा प्रकारचे अनेक खोटे व्हिडीओ तयार करण्यात माहीर आहेत, असा टोलाही त्यांनी लगावला. कॉंग्रेसकडून तुष्टीकरण प्रत्येक नागरिकासाठी एकच कायदा असेल. कॉंग्रेसच्या तुष्टीकरणाच्या राजकारणामुळे दशकांपासून याची अंमलबजावणी रखडली होती. जेथे आमची सरकारे आहेत तिथे आम्ही हा कायदा आणला आहे, बंगालमध्येही तो लागू करू असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले.

# अमरावतीत एसटी वाहकाची दारूच्या वादातून हत्या : दीड तासात आरोपींना बेड्या

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***अमरावती*** – शहरात दारूच्या कारणावरून झालेल्या किरकोळ वादाचे रूपांतर भीषण हत्येत झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. एका एसटी वाहकाची (कंडक्टर) निर्घृण हत्या करण्यात आली असून, अमरावती पोलिसांनी तत्परता दाखवत अवघ्या दीड तासात मुख्य आरोपींना ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत व्यक्ती एसटी महामंडळात वाहक म्हणून कार्यरत होती. रात्रीच्या सुमारास आरोपी आणि वाहक यांच्यात दारू पिण्यावरून वाद झाला.

# स्वामी विवेकानंद कॉलेजमध्ये पदवी वितरण समारंभ मोठ्या उत्साहात

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – ज्ञानसागर शिक्षण व बहुउद्देशीय संस्था द्वारा संचालित स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, सायन्स अँड आर्ट्स, येथे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे दिशानिर्देशानुसार सन २०२४-२५ या सत्राचा पदवी वितरण समारंभ मोठ्या उत्साहात व दिमाखात पार पडला.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.प्राची ठाकरे तर प्रमुख अतिथी म्हणुन अधिसभा सदस्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती प्रा.डॉ.सावंत देशमुख, कला व वाणिज्य महाविद्यालय येथील प्रा.डॉ.शशिकांत काळे, महात्मा फुले कला व सायन्स महाविद्यालय येथील प्रा.माधुरी उमेकर तसेच प्रा.सचिन राऊत इत्यादी मान्यवर उपस्थित होते तसेच महाविद्यालयातील प्रा.डॉ.पी.पी.पानसे, ग्रंथालय शास्त्र विभागप्रमुख प्रा.विजय ठाकरे, बीएजेएमसी विभागप्रमुख प्रा.अमरदीप खाडे, बीबीए विभागप्रमुख प्रा.चेतन गणोरकर, बीसीए विभागप्रमुख प्रा.अनुप बेले आदी मान्यवरांचीही उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात वैराग्यमुर्ती संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पुजन व विद्यापीठ गीत गायनाने करण्यात आली. त्यानंतर बीबीए, बीसीए, बीएजेएमसी, बी.लिब.इत्यादी अभ्यासक्रमातील सत्र २०२४-२५ मधील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व अभिमानाचे भाव दिसुन येत होते. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या कार्यपद्धतीनुसार या समारंभाचे सुयोग्य नियोजन करण्यात आले होते. समारंभाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांच्या यशाबद्दल अभिनंदन केले व उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन प्रा.आशिष शहाणे यांनी केले. संचालन प्रा.राहुल शिवारे यांनी प्रभावीपणे पार पाडले तर प्रास्ताविक प्रा.अमरदीप खाडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील प्रा.सौरभ आकोटकर, प्रा.माधवी घोरमाडे, प्रा.संजीवनी बारस्कर, प्रा.राजकुमार वानखडे, प्रा.प्रफुल्ल बहरुपी, प्रा.चेतन ढोले, प्रा.आलिया खान, प्रा.साक्षी राठी, प्रा.अनुजा मडघे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी नितीन भुसारी, गौरव वाघमारे, सुरज रामटेके, मयुर चौराशे, निर्मल जीवणाचे आदींनी मोलाचे सहकार्य केले.

### ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी

# माजी आमदार देवेंद्र भुयार यांना निवेदन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – महाराष्ट्र ग्रामपंचायत कर्मचारी संघटना तालुका वरुडच्या वतीने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या विविध न्याय व प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी माजी आमदार देवेंद्र भुयार यांची भेट घेऊन त्यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले.

या भेटी दरम्यान संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या समस्यांवर माजी आमदार देवेंद्र भुयार यांच्याशी सविस्तर चर्चा केली.

कर्मचाऱ्यांच्या व्यथा ऐकुन घेतल्यानंतर या मागण्यांसंदर्भात संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत लवकरच एक विशेष प्रशासकीय बैठक आयोजित करण्यात येईल आणि प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, असे आश्वासन देवेंद्र भुयार यांनी दिले.

यावेळी तालुका अध्यक्ष गितेश हरले, उपाध्यक्ष सागर वाघमारे, सहसचिव रमण मोहाडे यांच्यासह संघटनेचे अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

चला आपले आज आपण येणाऱ्या पिढीच्या उज्वल भविष्या साठी त्याग करू.

## लोकशाहीचा गळा आवळणारे ‘मतदार वजाबाकी’चे राजकारण

लोकशाहीमध्ये ’मतदान’ हे केवळ एक कर्तव्य नसून ते सामान्य नागरिकाच्या हातातील सर्वात शक्तिशाली शस्त्र आहे. ‘लोकांनी, लोकांसाठी चालवलेले राज्य‘ ही लोकशाहीची व्याख्या तेव्हाच सार्थ ठरते, जेव्हा प्रत्येक पात्र नागरिकाला आपले मत नोंदवण्याची समान संधी मिळते. मात्र, अलीकडच्या काळात विविध राज्यांमध्ये समोर येत असलेली आकडेवारी आणि घटना अत्यंत चिंताजनक आहेत. मतदारांचा विश्वास संपादन करून निवडणूक जिंकण्याऐवजी, विशिष्ट मतदारांनाच निवडणूक प्रक्रियेपासून पद्धतशीरपणे दूर ठेवण्याचे प्रयत्न होताना दिसत आहेत. लक्षावधी मतदारांची नावे यादीतून गायब होणे किंवा त्यांना मतदानापासून रोखणे, हे केवळ तांत्रिक चुकांचे फलित नसून लोकशाहीच्या मूलतत्त्वांना दिलेला मोठा धक्का आहे.

मतदार यादीतील ’सर्जिकल स्ट्राईक’

निवडणूक प्रक्रिया पारदर्शक असण्यासाठी ’शुद्ध मतदार यादी’ असणे अनिवार्य आहे. मात्र, अनेक राज्यांतून अशा तक्रारी येत आहेत की, विशिष्ट वस्त्या, विशिष्ट विचारधारा मानणारे गट किंवा विशिष्ट समुदायांची नावे मतदार यादीतून मोठ्या प्रमाणावर वगळली जात आहेत. जेव्हा एखादा नागरिक मतदानाचा हक्क बजावण्यासाठी उत्साहाने केंद्रावर पोहोचतो आणि तिथे त्याला कळते की त्याचे नावच यादीत नाही, तेव्हा तो केवळ एका मताचा अधिकार गमावत नाही, तर त्याचा व्यवस्थेवरचा विश्वासही उडतो. लक्षावधी लोकांसोबत जेव्हा हे घडते, तेव्हा त्याला ’प्रशासकीय चूक’ म्हणणे कठीण होते; तो एक राजकीय कट वाटू लागतो. प्रक्रियेपासून दूर ठेवण्याचे तंत्र

मतदारांना प्रक्रियेपासून दूर ठेवण्यासाठी केवळ नावे वगळणे हेच एक साधन नाही, तर त्यामध्ये अनेक पदर आहेत:

मतदान केंद्रांचे लांबणीवर स्थलांतर: ग्रामीण भागात किंवा दुर्गम वस्त्यांमध्ये राहणाऱ्या लोकांसाठी मतदान केंद्रे त्यांच्या आवाक्याबाहेर नेली जातात, जेणेकरून प्रवासाच्या त्रासामुळे लोक मतदानाला जाणार नाहीत.

कागदपत्रांची जाचक अट: तांत्रिक कारणास्तव किंवा किरकोळ त्रुटींमुळे ओळखपत्रांना अवैध ठरवणे.

भीतीचे वातावरण: विशिष्ट भागांत मतदानाच्या दिवशी तणाव निर्माण करणे, जेणेकरून सामान्य मतदार घराबाहेर पडण्यास धजावणार नाही.

हे सर्व प्रकार ’लोकशाही’ नावाच्या इमारतीचा पाया पोखरण्याचे काम करत आहेत. जर सत्ताधारी किंवा विरोधक जनतेचा कौल घेण्याऐवजी जनतेलाच निवडीच्या प्रक्रियेतून बाद करत असतील, तर त्या विजयाला नैतिक अधिष्ठान उरत नाही.

डिजिटल युगातील नवी आव्हाने

आज आपण डिजिटल इंडियाच्या गप्पा मारतो, पण याच तंत्रज्ञानाचा वापर करून ’मतदार फिल्टरिंग’ केले जाण्याची भीती व्यक्त होत आहे. डेटा अल्गोरिदमच्या साहाय्याने कोणत्या भागातील मतदार कोणाला मतदान करू शकतात, याचा अंदाज बांधून तिथली मतदार नोंदणी संथ करणे किंवा नावे गहाळ करणे सोपे झाले आहे. निवडणूक आयोगासारख्या स्वायत्त संस्थेवर जेव्हा अशा प्रक्रियेवरून प्रश्नचिन्ह उपस्थित होते, तेव्हा ते लोकशाहीच्या आरोग्यासाठी घातक असते.

लोकशाहीच्या मूलतत्त्वांना धक्का

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी प्रत्येक नागरिकाला ’एक माणूस, एक मत आणि एक मूल्य’ हा अधिकार दिला. हा अधिकार देण्यामागे उद्देश हाच होता की, शेवटच्या रांगेतील माणसाचा आवाजही संसदेत पोहोचला पाहिजे. मात्र, जर मतदारांनाच प्रक्रियेतून बाहेर काढले गेले, तर ’बहुमताचे राज्य’ हे केवळ नावापुरते उरेल आणि प्रत्यक्षात ती ’निवडक लोकांची हुकूमशाही’ ठरेल. मतदारांचा विश्वास जिंकणे हे कठीण काम आहे, त्यासाठी विकासकामे करावी लागतात, जनतेच्या प्रश्नांना भिडवावे लागते. या कष्टाला बगल देण्यासाठी ’मतदार वजाबाकी’चा सोपा मार्ग निवडणे ही राजकीय दिवाळखोरी आहे. सावध होण्याची वेळ लोकशाही टिकवून ठेवण्याची जबाबदारी केवळ निवडणूक आयोगाची किंवा न्यायालयांची नाही, ती प्रत्येक नागरिकाची आहे. मतदार यादीत आपले नाव आहे की नाही, हे तपासण्यापासून ते अशा अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यापर्यंत सर्वांना सक्रिय व्हावे लागेल. राजकीय पक्षांनीही हे समजून घेतले पाहिजे की, मतदारांना दूर ठेवून मिळवलेला विजय हा क्षणभंगुर असतो. जनतेचा रोष जेव्हा अनावर होतो, तेव्हा कोणतीही यंत्रणा सत्तेचा बचाव करू शकत नाही. निवडणूक ही लोकशाहीचा उत्सव असायला हवी, पण जेव्हा या उत्सवातून मूळ पाहुण्यांनाच (मतदारांना) बाहेर काढले जाते, तेव्हा त्या प्रक्रियेचे पावित्र्य नष्ट होते. निकाल आपल्या बाजूने वळवण्यासाठी लोकशाहीच्या गळ्याला नख लावण्याचे हे प्रयत्न थांबले पाहिजेत. जर आज आपण लक्षावधी मतदारांच्या या हक्कासाठी उभे राहिलो नाही, तर भविष्यात ’लोकशाही’ हे केवळ पुस्तकात वाचण्याचे एक तत्व उरेल.

# बहुजनांच्या शैक्षणिक व सामाजिक सुधारणा करणारे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले

इंग्रजी राजवटीत शैक्षणिक व सामाजिक सुधारणा करणारे, मानव मुक्तीचा जाहीरनामा असलेले ग्रंथ, पुस्तके व नाटिका लेखन करणारे, बहुजनांसाठी जीवनभर झटणारे, जीवनात ‘सत्यधर्म ’चा अवलंब करणारे, युक्ती आणि कृती याचा समन्वय साधणारा लोकनायक तसेच महर्षी म्हणजे महात्मा जोतिबा फुले होय. आई चिमणाबाई व वडील गोविंदराव यांच्या पोटी ११ एप्रिल १८२७ मध्ये जन्म झाला.

जोतिबा ८ महिन्याचे असतांना आजारपणामुळे त्यांच्या आईचे निधन झाले. अशा वेळेस गोविंदरावांनी त्यांची मावस बहीण सगुना ही विधवा होती. आपली बहीणच आपल्या जोतिला आईसारखे प्रेम व वात्सल्य देईल, असे गोविंदरावांना वाटले आणि तसे झाले. जोतिबा पाच–सहा वर्षाचा असतांना वडिलांना व त्याची आत्या सगुना यांना निरनिराळे प्रश्न विचारत होता. यावरुन बालपणीच जोतिबाची तरतरीत बुद्धी व चौकस स्वभावाची प्रचिती येते. आपला मुलगा जोतिने खूप शिकावं आणि मोठं व्हावं, असे त्यांच्या वडिलांना वाटे. कसलीही सुविधा नसणाऱ्या मराठी शाळेत तीन–चार वर्षांचे शिक्षण झाले. गणितामध्ये त्यांची तल्लख बुद्धी होती. या महर्षिला विद्यार्थ्यांना त्रास देणे, खोड्या काढणे, टिंगल–टवाळी करणे हे लहानपणापासूनच आवडत नसे. अशातच वडील गोविंदराव यांच्यावर समाजातील लोकांचे जोतिबाला शिक्षण देऊ नये, अशा धमक्या पण येऊ लागल्या होत्या. मराठी शाळेतील त्यांची प्रगती पाहुन जोतिला आपण इंग्रजी शाळेत टाकावे, असे त्यांच्या वडिलांना वाटत होतं पण समाज व्यवस्था अशी होती की बाप जे काम करीत असेल तेच काम पुत्राने सुद्धा करावे; परंपरा मोडण्याचे धाडस करु नये. तरी पण समाजव्यवस्थेत असणाऱ्या या परंपरागत व अडाणी विचाराला गोविंदरावांनी फाटा दिला. गोविंदरावांच्या मळा शेजारी गफार बेग मुंशी यांचा शेत मळा होता. यांनी जोतिची इंग्रजी शाळेत शिकण्याची सोय केली. वयाच्या तेराव्या–चौदाव्या वर्षी ते इंग्रजी शाळेत जाऊ लागले. इंग्रजी शाळेतील प्रत्येक विषय समजुन घेऊन शिक्षण घेत होते. यासोबत खेळ सुद्धा त्या ठिकाणी शिकविल्या जात होता. म्हणुन जोतिबाला खेळाची सुद्धा आवड निर्माण झाली. याव्यतिरिक्त शरीर पिळदार बनवण्यासाठी शाळे जवळील शेजारच्या व्यायाम शाळेत जात होते. तिथे मल्लखांब, कुस्ती यासारखे निराळे शिक्षण घेऊ लागले. जोतिबा मॅट्रिक झाला. इंग्रजी शाळा असल्यामुळे शाळेत साचेबद्ध असे शिक्षण होते. म्हणुन त्यांनी या शिक्षणाला रामराम ठोकला. शिक्षीत नसलेल्या लोकांचा दुकानदार व व्यापारी अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना कसे फसवतात? हे त्यांनी जवळुन पाहिलं. अशा अडाणी अज्ञानी लोकांना सन्मार्ग कोण दाखवणार? यांची सुधारणार कोण करणार? या विचाराने ते अस्वस्थ होत होते. शाळेतील शिक्षणाला रामराम ठोकल्यानंतर निरनिराळ्या विषयाची पुस्तके वाचुन मनातील ज्ञानाची भुक भागविली. तुकाराम गाथा, भागवत, ज्ञानेश्वरी, गीता, उपनिषदे अशा अनेक ग्रंथांचे वाचन त्यावेळी जोतिबांनी केले. यामधील प्राप्त ज्ञानाचा उपयोग समाजव्यवस्थेच्या सुधारणेसाठी करावा, असे विचार त्यांच्या मनात आले. अनेक ग्रंथ संपदा मधुन ज्ञान प्राप्त केल्यावर सर्व लोकांना शिक्षण मिळाल्याशिवाय त्यांची प्रगती तसेच त्यांच्यात सुधारणा होणे शक्य नाही, हे त्यांनी जाणले. इंग्रजी राजवट सुरु झाल्यामुळे इंग्रजांनी शिक्षणासाठी शाळा काढल्या पण त्या शाळेत ठराविक व विशिष्ट लोकांचे शिक्षण होत होते. बहुजनांचे म्हणजे तळागाळातल्या लोकांचे शिक्षण होत नव्हते. बहुजनांचे शिक्षण झाल्या शिवाय देश सुधारु शकत नाही, हे ते ओळखून होते. जोतिबाचे लग्न सावित्रीबाई यांच्यासोबत १८४० मध्ये रंगपंचमीच्या दिवशी झाले. सावित्रीचे शिक्षण मुळीच झाले नव्हते म्हणुन सावित्रीने शिकावे, अशी त्यांची इच्छा होती. जोतीबांनी सावित्रीबाईच्या शिक्षणाला सुरुवात करुन चार–पाच वर्षातच इयत्ता सातवी पर्यंतचा अभ्यास करुन घेतला. पत्नी सावित्रीला अभ्यासाव्यतिरिक्त पौराणिक, ऐतिहासिक व थोर लोकांच्या कथा तसे चरित्र वाचण्याची तिच्यामध्ये अभिरुची निर्माण केली. एकदा एका मित्राच्या लग्नाला मित्राच्या आग्रहाखातर लग्नसमारंभात गेले. जोतिबा लग्नसमारंभात आल्यामुळे सनातनी ब्राह्मण मंडळींनाही आवडले नाही. ज्योतिबाला हाकलून द्या, असे ते म्हणु लागले. जोतिबाला हा अपमान सहन झाला नाही. आल्यावाटेने जोतिबा परत आपल्या घरी आले. मंगल कार्यामध्ये सुद्धा माणुसकी म्हणजे काय? या ब्राह्मणांना समजत नाही. यांना मी एक दिवस चांगला धडा शिकवीन. या दिवसापासून ब्राह्मणांवरचा आदर भाव त्यांच्या मनात राहिला नाही. संतापलेल्या स्थितीत ते घरी आले. वडिलांनी त्याला धीर दिला. मोठा झाल्यावर तुला याच विरोधात खुप तोंड द्यावे लागेल आणि या विरोधाला तोंड देण्याचे धैर्य मिळो असा आशीर्वाद वडिलांनी दिला. सामाजिक परिस्थितीसी चार हात करण्यास ते समर्थ होते. अशा उच्चवर्णीय समाजाला जुमानणारे ते नव्हते. मुर्तीपूजा करणे व साधुसंतांच्या सर्व वचनावर डोळे झाकून विश्वास ठेवणे हे त्यांना पटत नव्हते. संत तुकाराम, ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास यांच्या बद्दल आदर भाव होता. संत सावता माळी सारख्या तसेच इतर संतांच्या जन्मभूमीत कोणत्याही संतांनी कधी कुणाची निंदा–नालस्ती, स्पृश्य–अस्पृश्य असा भेदाभेद केला नाही. मग ब्राह्मणांनी सुद्धा भेदाभेद करु नये व सामाजिक व्यवस्था बिघडविण्याचे बिगुल किंवा तुतारी वाजविण्याचे षडयंत्र करु नये, अशा विचारांचे ते होते असे मला वाटते. १९ व्या शतकात सनातनी वृत्ती समाजात जास्त होती. स्पृश्य–अस्पृश्य व अडाणीपण होते या अडाणी पणाला हाकलुन सुधारणा करण्याचे धाडस त्यावेळी हिंमत किंवा धैर्य लोकांमध्ये



दिसून येत नव्हते, हे जोतिबांनी स्वतः पाहिलं. अस्पृश्यांना स्पृश्य व उच्चवर्णीय लोक समारंभात येऊ देत नव्हते सनातनी वर्ग धर्म शास्त्रांचा आधार घेऊन खोटे–नाटे सांगुन अस्पृश्यांना हिनतेची व तुच्छतेची वागणुक देत होते. त्यांचा स्पर्श सुद्धा माणुसकीला काळिमा फासणारा आहे असे उच्चवर्णीय यांचे मत होते.स्पृश्यानां मुस्लिम, पारशी, ख्रिस्ती या लोकांचा स्पर्श चालत होता पण अस्पृश्यांचा स्पर्श मात्र विटाळ वाटत होता. या विरुद्ध आपल्याला लढा देण्याची गरज आहे, असे ज्योतिबांनी ठरविले. त्यावेळी मुलींना शिकविणाऱ्या शाळा नव्हत्या. सर्वात प्रथम भिडे वाड्यात १८४८ मध्ये पुण्यामध्ये मुलींची शाळा काढली. त्या मुलींना शिकविण्याचे कार्य स्वतः व त्यांच्या पत्नीने केले. शाळा काढल्यामुळे लोक त्यांच्याविषयी अभद्र बोलत होते पण जोतीबांनी ज्या कार्यासाठी पाऊल टाकलं त्यामध्ये कितीही संकटे आली तरी माघार घ्यायची नाही असा बाणा होता. समाजातील काही कर्मठ लोक त्यांचे वडील गोविंदरावकडे गेले. महात्मा फुलेंचे गाऱ्हाणे मांडले. शेवटी वडील गोविंदरावांनी शाळा बंद कर नाही तर घर सोडून जा, असा इशारा दिला व खडसावले. बहुजनांच्या शिक्षणासाठी उद्धारासाठी त्यांच्या ज्ञानाचा दिवा पेटविण्यासाठी वैयक्तिक सुखापेक्षा समाजहित पाहणाऱ्या जोतिबांनी स्वतःच्या संसाराची चिंता न करता त्याचा शब्द प्रमाण मानला व पत्नीसह घराबाहेर पडले. ४ मार्च १८५१ मध्ये बुधवार पेठ येथे दुसरी शाळा तर तिसरी रास्ता पेठेत काढली. वडिलांकडून पैसे मिळणे बंद झाले म्हणुन त्यांनी कंट्रातदाराचा व्यवसाय स्विकारला. यामध्ये मजुरांच्या मदतीने ते काम पूर्ण करीत असे. यातुन मिळणारे मिळकत समाजातील मुलांच्या शिक्षणासाठी व अन्य सामाजिक कार्यासाठी वापरीत. १८५२ मध्ये अस्पृश्यांच्या मुलांसाठी शाळा सुरु केली. १८५५ मध्ये प्रौढांच्या शिक्षणासाठी रात्रीची शाळा काढली. त्यांना मारायला आलेल्या दोघांना या शाळेत त्यांनी टाकले व शिकुन साक्षर झालेले ते दोघे जीवनभर जोतिबांचे अंगरक्षक म्हणुन राहिले. म्हणजेच मारेकऱ्यांमध्ये परिवर्तन करणारे असे जोतिबा फुले होते. १८५३ मध्ये महार–मांग यांना विद्या शिकविणारी संस्था काढली. इंग्रजी राजवटीला लाजवणारे, असे शिक्षण जोतिबांच्या शाळेत मे.कँडी साहेब यांनी पाहिले. शिस्त, प्रगती, अस्पृश्य असलेल्या मुला–मुलींचे स्पष्ट व शुद्ध उच्चार, लेखन व वाचन त्यांनी पाहिले. इंग्रज सरकारने सुद्धा फुले यांचे शैक्षणिक कार्य पाहुन १६ नोव्हेंबर१८५२ मध्ये विश्रामबाग वाड्यात पुणे येथे दोनशे रुपयेची शाल व श्रीफळ देऊन त्यांचा कार्याचा गौरव इंग्रज सरकारला करावा लागला. शिव्या निंदा–नालस्ती हा अनुभव रोजचा त्यांचा होता; पण सत्काराचा अनुभव हा इंग्रजी राजवटीत सोनेरी किरणांनी जीवन प्रकाशमय करावे असा होता. सत्काराला उत्तर देतांना स्त्रिया व शूद्र यांची सेवा अधिकाधिक माझ्या हातुन घडो अशी भावना ज्योतिरावांनी व्यक्त केली. शैक्षणिक सुधारणे सोबतच सामाजिक कार्य सुद्धा महात्मा फुले अग्रेसर होते. लोकांचा विरोध सहन करुन बालविवाह पद्धती तसेच वैधव्य आलेल्या मुलीचे दुसऱ्या मुलाशी पुन्हा लग्न करुन जीवन सुखी करण्याचे त्यांनी शिकस्तीने प्रयत्न केले. विधवा झालेल्या स्त्रियांवर समाजातील वाईट व पापी लोकांनी दुष्कर्म केल्यामुळे काही स्त्रिया गरोदर होत होत्या. अशा परिस्थितीत या संकटातून मुक्त होईपर्यंत ते अशा स्त्रियांना आधार देत होते. त्यांची पत्नी सावित्रीबाई स्वतः त्यांचे बाळंतपण करीत असे. नवजात बालकांना अनाथाश्रमात ठेवुन त्यांची सर्व व्यवस्था करीत होते स्त्रीवर वैधव्याचा प्रसंग आला तर यावेळी स्त्रियांचे केशवपन करीत असे हे केशवपन बंद करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. १८६३ मध्ये बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. काही तरुण–तरुणींचे पती किंवा पत्नी वारल्यानंतर जोतिबांनी पुनर्विवाह करुन दिले. पहिला पुनर्विवाह १८६४ मध्ये घडवुन आणला. अभागी ब्राह्मण काशी विधवेचा मुलगा यशवंत याला दत्तक घेतले. त्याला डॉक्टर केले. पाणी हेच माणसाचे जीवन आहे, असे म्हणतात. सार्वजनिक विहिरीचे पाणी हे सर्वांसाठी खुले असलेस पाहिजे, त्यावर कोणीही आपला अधिकार किंवा हक्क दाखवु नये, असे समाजातील उच्चवर्णीयांना त्यावेळेस सांगणारे ते लोक नायक होते. स्पृश्य–अस्पृश्य असा त्यावेळी भेद होता. अस्पृश्यांना पाणी घेण्याचा अधिकार होता परंतु विहिरीतुन स्वतः पाणी ओढून घेणे हा अधिकार नव्हता. एकेदिवशी वैशाख महिन्याच्या रखरखत्या उन्हात अस्पृश्यांच्या बायका व मुले एका सार्वजनिक विहिरीजवळ पाणी भरण्यासाठी आलेल्या होत्या; पण त्यांना विहिरीतील पाणी काढण्याची मोकळीक नव्हती हे जोतिबांनी पाहिले. रखरखत्या उन्हात पाणी मिळण्याच्या प्रतीक्षेत उभ्या असणाऱ्या स्त्रियांना स्वतःच्या घरातील अंगणातला पाण्याचा हौद सर्वांसाठी खुला करुन दिला. यामुळे उच्चवर्णीय तसे इतरांनी सुद्धा धर्म बुडविण्याचा आपण प्रयत्न करीत आहे, असा आरोप त्यांच्यावर लावला. आरोप करणाऱ्या लोकांनी व गृहा पर्यंत आलेल्या लोकांना आल्यापावली वापस धाडण्याचे धाडस त्यांच्यामध्ये होते आणि ते त्यांनी करुन दाखविले. महात्मा फुले यांचे घर आणि ती विहीर राष्ट्रीय स्मारक म्हणुन पहावयास मिळते. २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. १८७६ ते १८७७ च्या काळात महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला होता. अशावेळी सरकारकडे रयतेची गाऱ्हानी सरकारकडे मांडली. लोकांकडून मदत मिळवुन दुष्काळाने पछाडलेल्या लोकांसाठी अन्नछत्र उघडले. १८७४ ते १८८२ पर्यंत नगरपालिकेचे सदस्य पण होते. १८७९ मध्ये रायगडावरील शिवाजी महाराजांच्या समाधीचा जीर्णोद्धार त्यांनी केला. इंग्रज सरकारने शिक्षणात वाढ व सुधारणा करण्यासाठी मॅकोले साहेब यांना मुख्य केले होते. मॅकोले साहेबांना विरोध करुन देशातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत मिळालेच पाहिजे. पाटी–पेन्सिल सुद्धा सरकारने पुरवावे. सरकारने दारिद्र्याने ग्रासलेल्या तसेच खालच्या वर्गातील लोकांना शिक्षणाची प्रथम संधी द्यावी व नंतर इतरांना द्यावी. ज्या मुलांना शिक्षणाचा गंधच नाही त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था सरकारने प्रथम करावी, असे इंग्रज सरकारला ठणकावुन सांगितले. याचा परिणाम इंग्रज सरकारलाही काही प्राथमिक शाळा सुरू कराव्या लागल्या. मुले–मुली ज्योतिबांच्या या प्रयत्नांमुळे शिक्षण घेऊ लागले. १९ व्या शतकातील अज्ञानी समाजाला उन्नतीचा कानमंत्र देताना ते म्हणतात, ‘विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीती विना गती गेली, गती विना वित्त गेले, वित्ता विना शूद्र खचले, इतके सारे अनर्थ एका अविद्येने केले’आपल्या लेखन शैलीतुन मानव मुक्तीचा मार्ग दाखविण्यासाठी, ब्राह्मणांचे कसब, गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड, अस्पृश्यांची कैफियत, शिवरायांचा इतिहास समजण्यासाठी पोवाड्याचे लेखन, तृतीय रत्न ही नाटिका यासारखे अनेक ग्रंथसंपदा लिहिली. यांनी लिहिलेल्या ग्रंथसंपदा व विचारांची प्रेरणा घेऊन आजवर अनेक साहित्यिक निर्माण झाले आहे. अठरापगड जातीच्या लोकांनी १८८८ मध्ये कोळी वाड्यात मुंबई येथे कृतज्ञता व प्रेमाने या थोर पुरुषास ‘महात्मा’ ही मानाची पदवी दिली.

अशा या बहुजनांसाठी झटणाऱ्या, शैक्षणिक व सामाजिक सुधारणा करणाऱ्या, स्त्रियांच्या शिक्षणात खूप मोलाचा वाटा असणाऱ्या या महर्षीचा मृत्यू २८ नोव्हेंबर १८९० ला झाला. इंग्रजी राजवटीत १९ व्या शतकात शैक्षणिक कार्य करणाऱ्या महात्मा फुले यांचा जन्मदिवस किंवा मृत्यू दिनांक ‘शिक्षक दिन’ म्हणुन साजरा करण्यात यावा, असे निवेदन, काही प्रस्ताव अनेक संघटना, संस्था यांनी शासनाकडे पाठविले आहे. या महामानवास भारत सरकारने सुद्धा भारतरत्न हा पुरस्कार द्यावा, असे मला वाटते. या शिक्षण महर्षीस भारतरत्न पुरस्कार मिळावा म्हणुन काही संस्था स्वाक्षरीपटाचा अवलंब करुन भारत सरकारकडे पाठविला आहे, अशा या लोकनायक महर्षीस माझे शतशः प्रणाम..!



प्रदीप गणोरकर
शिक्षक, जि.प.पुर्व माध्य शाळा
करजगाव, ता.वरुड
मो.क्र.९४२१७३८७४२

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# ठाण्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षसंघटनेची पुनर्रचना

## सर्व समित्या बरखास्त, पक्षबांधणीला जोमाने सुरुवात

(प्रतिनीधी वरूड दर्पण)




**ठाणे :-** ठाण्यात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षसंघटनेची पुनर्रचना करण्यात येणार असून शहरासह महिला, युवा आणि इतर सर्व समित्या बरखास्त करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. पक्षाला नव्याने बळकटी देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

अलीकडेच झालेल्या बैठकीत स्थानिक पक्ष नेतृत्वाने सर्व समित्या बरखास्त करण्याचा निर्णय घेतला. तसेच पक्ष सोडून इतरत्र जाण्याची इच्छा असलेल्या पदाधिकाऱ्यांना कोणतीही अडचण न आणता वाट मोकळी करून देण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले.

पुढील काळात नव्याने संघटनात्मक रचना जाहीर केली जाणार असल्याने नव्या पदाधिकाऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. ठाणे महापालिकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ला अपेक्षित यश मिळाले नसले, तरी पक्षाचे ९ नगरसेवक निवडून आले आहेत. मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षाला मोठा धक्का बसला असून संघटनात्मक पातळीवर अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस गट एकत्र येण्याच्या चर्चांनाही काहीसा विराम लागल्याने स्थानिक पदाधिकारी द्विधा मनःस्थितीत असल्याचे चित्र आहे.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे ठाणे शहर जिल्हाध्यक्ष नजीब मुल्ला यांनी पदाधिकाऱ्यांची बैठक घेत पक्षाच्या सद्यस्थितीवर भाष्य केले. यावेळी त्यांनी, ज्यांना पक्ष सोडून इतरत्र जायचे असेल त्यांनी निसंकोचपणे जावे; त्यांना अडवले जाणार नाही. सध्या पक्षाकडे देण्यासाठी बरेच काही नसले तरी सोबत राहणाऱ्यांना सांभाळून घेतले जाईल, असे सांगितल्याची माहिती मिळाली आहे. बैठकीनंतर युवा, महिला आणि इतर सर्व समित्या बरखास्त करण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले.

जुन्या पदाधिकाऱ्यांना नव्या जबाबदाऱ्या आता पक्षसंघटनेला नवसंजीवनी देण्यासाठी नव्याने रचना केली जाणार असून त्यासाठी स्वतंत्र बैठक घेण्यात येणार आहे.

नव्याने गठित होणाऱ्या समित्यांमध्ये नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाणार असल्याची शक्यता आहे. तसेच काही जुन्या पदाधिकाऱ्यांना नव्या जबाबदाऱ्या सोपविण्याचाही विचार सुरू असल्याची माहिती मिळत आहे.

# महात्मा जोतिबा फुले : थोर समाजसुधारक

भारतीय समाजाच्या इतिहासात महात्मा जोतिराव गोविंदराव फुले हे एक तेजस्वी, क्रांतिकारी आणि दूरदर्शी व्यक्तिमत्त्व म्हणुन ओळखले जातात. त्यांनी समाजातील अन्याय, अज्ञान, अंधश्रद्धा आणि जातिभेद याविरुद्ध आयुष्यभर संघर्ष केला. त्यांच्या कार्यामुळे भारतीय समाजाला नवचैतन्य प्राप्त झाले आणि सामाजिक समतेचा मार्ग खुला झाला.



महात्मा फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी पुणे येथे झाला. ते माळी समाजात जन्माला आले. लहानपणीच त्यांच्या आईचे निधन झाले, त्यामुळे त्यांचे संगोपन वडील गोविंदराव आणि नातेवाईकांनी केले. आर्थिक परिस्थिती साधी असतानाही त्यांनी शिक्षण घेतले. स्कॉटिश मिशन स्कूलमध्ये शिक्षण घेत असताना त्यांना समतेचे आणि मानवतेचे विचार समजले, ज्याचा त्यांच्या पुढील आयुष्यावर मोठा प्रभाव पडला. एक प्रसंग त्यांच्या आयुष्यात निर्णायक ठरला. एका ब्राह्मण मित्राच्या लग्नाला गेले असता, त्यांना त्यांच्या जातीमुळे अपमानित करण्यात आले. या घटनेने त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला आणि त्यांनी समाजातील जातिभेदाविरुद्ध लढण्याचा निश्चय केला. याच क्षणापासून त्यांच्या समाजसुधारणेच्या कार्याला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. स्त्री-शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्यांनी १८४८ साली पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. या कार्यात त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी त्यांना खंबीर साथ दिली. सावित्रीबाई या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका ठरल्या. त्या शाळेत जाताना त्यांच्यावर दगड-चिखल फेकला जात होता, शिवीगाळ केली जात होती; तरीही त्यांनी हार मानली नाही. त्यांनी शिक्षणाचा दीप प्रज्वलित ठेवला आणि हजारो मुलींना शिक्षणाची संधी दिली.

महात्मा फुले यांनी शुद्र-अतिशूद्रांसाठीही शाळा सुरु केल्या. त्या काळात अस्पृश्यांना शिक्षण देणे हा मोठा गुन्हा मानला जात होता, पण त्यांनी सर्व विरोधाला न जुमानता हे कार्य सुरु ठेवले. त्यांनी समाजातील सर्व घटकांना शिक्षणाचा हक्क मिळावा यासाठी अथक प्रयत्न केले. १८७३ मध्ये त्यांनी सत्यशोधक समाज स्थापन केला. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी जातिभेद, अंधश्रद्धा आणि अन्यायकारक प्रथा याविरुद्ध जनजागृती केली. सत्यशोधक समाजाने विवाहविधी साधे केले, ब्राह्मण पुजाऱ्यांशिवाय विवाह करण्याची प्रथा सुरु केली आणि समाजात समानतेचा संदेश दिला. महात्मा फुले हे एक उत्तम लेखक आणि विचारवंतही होते. त्यांनी 'गुलामगिरी' या ग्रंथातून समाजातील अन्यायकारक व्यवस्था आणि शोषण यावर कठोर टीका केली. त्यांनी अमेरिकेतील गुलामगिरीचा संदर्भ देत भारतीय समाजातील शूद्र-अतिशूद्रांची स्थिती स्पष्ट केली. 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथातून त्यांनी शेतकऱ्यांच्या हालअपेष्टा मांडल्या आणि सरकारच्या धोरणांवर टीका केली. महात्मा फुले यांनी स्त्रियांच्या उन्नतीसाठी अनेक कार्ये केली. त्यांनी विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले, बालविवाहाचा विरोध केला आणि स्त्रियांच्या सन्मानासाठी लढा दिला. त्यांनी अनाथ मुलांसाठी आश्रयगृह सुरू केले. एका ब्राह्मण विधवेच्या बाळाला दत्तक घेऊन त्याचे संगोपन केले, यावरून त्यांच्या मानवतेचा आणि समतेचा आदर्श दिसुन येतो. त्यांनी पाण्याच्या प्रश्नावरही काम केले. त्या काळात अस्पृश्यांना सार्वजनिक विहिरीतून पाणी घेण्यास मनाई होती. महात्मा फुले यांनी आपल्या घरातील विहीर सर्वांसाठी खुली केली. हा निर्णय त्या काळात अत्यंत धाडसी होता आणि सामाजिक समतेचा मोठा संदेश देणारा होता. महात्मा फुले यांच्या कार्याचा प्रभाव पुढील अनेक समाजसुधारकांवर झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या महान व्यक्तींनीही त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेतली. त्यामुळे फुले यांचे योगदान भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अत्यंत मोलाचे मानले जाते. महात्मा फुले यांचे कार्य केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित नाही, तर आजही ते तितकेच प्रेरणादायी आहे. आजच्या आधुनिक युगातही समाजात असमानता, अज्ञान आणि भेदभाव काही प्रमाणात दिसून येतो. अशा वेळी फुले यांनी दिलेला समतेचा, शिक्षणाचा आणि मानवतेचा संदेश आपल्याला मार्गदर्शन करतो.

समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेले कार्य अमूल्य आहे. म्हणूनच महात्मा फुले हे केवळ समाजसुधारक नसून एक युगपुरुष म्हणून ओळखले जातात. त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन आपणही समाजात समता, शिक्षण आणि मानवतेचा प्रसार केला पाहिजे, हीच त्यांच्या प्रति खरी आदरांजली ठरेल.



**ह.भ.प.प्रा.दर्शन गावंडे महाराज**
रा.आलोडा, ता.वरुड
मो.नं.७४९९११३५०३

# एमआयएमवर 'मेहरबानी', ठाकरे गटाला 'तुटपुंजा' निधी : मुंबई महापालिकेच्या ८०० कोटींच्या विकासनिधीच्या वाटपावरुन नव्या वादाची



(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – मुंबई महापालिकेच्या स्थायी समितीमार्फत वितरित करण्यात आलेल्या तब्बल ८०० कोटींच्या विकासनिधीच्या वाटपावरून राजकीय वाद रंगण्याची शक्यता आहे.

सत्ताधारी भाजपने निधी वाटप करताना विरोधकांना दुय्यम वागणूक दिल्याचा आरोप केला जातो आहे. विशेष म्हणजे, एकेकाळचा मित्र पक्ष असलेल्या शिवसेना (ठाकरे गट) नगरसेवकांना केवळ २५ लाखांचा निधी देण्यात आल्याने नाराजी व्यक्त होत आहे. याउलट, प्रथमच निवडून आलेल्या एमआयएमच्या आठ नगरसेवकांना किमान दोन ते तीन कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. त्यामुळे भाजपच्या या 'एमआयएम प्रेमावर' राजकीय वतुर्ळात आश्चर्य व्यक्त होत असून, निधी वाटपाचा निकष नेमका काय होता, असा प्रश्न उपस्थित केला जातो आहे.

एमआयएमच्या नगरसेवकांना मिळालेला निधी पुढीलप्रमाणे प्रभाग १३४ – मेहजाबीन अतिक अहमद खान प्रभाग १३६ – जमीर कुरेशी प्रभाग १३७ – शमीर पटेल प्रभाग १३८ – रोशन इरफान शेख प्रभाग १३९ – शबाना आतिफ शेख प्रभाग १४० – विजय उबाळे प्रभाग १४३ – शबाना मोहम्मद फारूक काझी प्रभाग १४५ – खैरनुसा अकबर हुसेन दरम्यान, विरोधकांचा आरोप आहे की, राजकीय समीकरणे आणि अप्रत्यक्ष पाठिंबा लक्षात घेऊन निधी वाटप करण्यात आले आहे. तर दुसरीकडे, भाजपकडून मात्र निधी वाटप हे विकासकामांच्या गरजेनुसार आणि प्रभागांच्या प्राधान्यक्रमानुसार करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. या पार्श्वभूमीवर, महापालिकेतील निधी वाटपाचा मुद्दा पुन्हा एकदा राजकारणाच्या केंद्रस्थानी आला असून, आगामी सभागृहात यावर जोरदार चर्चा होण्याची शक्यता आहे.

# पहिल्यांदा एकमेकांना स्मितहास्य मग हात जोडले अन नंतर काही काळ गप्पाही रंगल्या

## पीएम मोदी अन राहुल गांधी निवडणुकीच्या धामधुमीत अचानक समोरासमोर येताच काय काय घडलं?

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – केरळ, बंगाल आणि आसामसह पाच राज्यांमधील निवडणुकीच्या लढाईमुळे राजकीय वातावरण तापत आहे. भारतीय राजकारणात आज एक अत्यंत विशेष क्षण आला, जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी अचानक समोरासमोर आले. राहुल गांधींनी हात जोडून पंतप्रधानांचे स्वागत केले. पंतप्रधान मोदींनीही हात जोडून त्यांचे स्वागत स्वीकारले. इतकेच नाही, तर त्यानंतर दोन्ही नेत्यांमध्ये संवाद झाला.



पंतप्रधान मोदी आणि राहुल गांधी यांच्यात काय घडले? पंतप्रधान मोदी संसद परिसरात पोहोचताच राहुल गांधी आणि जेपी नड्डा यांच्यासह अनेक नेत्यांनी हात जोडून त्यांचे स्वागत केले. पंतप्रधान मोदींनीही हात जोडून त्यांचे अभिवादन स्वीकारले. यानंतर पंतप्रधान मोदी आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यात संवाद झाला. प्रश्न असा आहे की, सध्या सुरू असलेल्या निवडणुकीच्या लढाईच्या पार्श्वभूमीवर, त्यांनी कोणत्या मुद्द्यांवर चर्चा केली हे अस्पष्ट आहे. मात्र, त्यांच्या संभाषणाच्या व्हिडिओवरून असे दिसते की, दोन्ही नेते अत्यंत गंभीर चर्चेत गुंतले होते. हात जोडून स्वागत, त्यानंतर संवाद पंतप्रधान मोदी आणि राहुल गांधी यांच्या या भेटीमागे नेमके काय घडले असेल, असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. आज महात्मा ज्योतिबा फुले यांची २०० वी जयंती आहे. या निमित्ताने संसद परिसरातील प्रेरणा स्थळ येथे एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला सत्ताधारी आणि विरोधी पक्षांचे खासदार, तसेच लोकसभा अध्यक्षांसह अनेक राजकीय दिग्गज उपस्थित होते. या सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी आलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांची भेट झाली. व्हिडिओ पहा. पंतप्रधान मोदींनी पुष्पहार अर्पण केला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसद परिसरातील 'प्रेरणा स्थळ' येथे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी लोकसभा अध्यक्ष ओम बिरला, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, केंद्रीय मंत्री अर्जुन राम मेघवाल, राज्यसभेचे माजी उपसभापती हरिवंश आणि इतर राजकीय दिग्गजही उपस्थित होते.

## क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून

# न.प.मराठी शाळेच्या प्रांगणत आज 'जागर समतेचा'

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून समता पर्व संयोजन समितीच्या वतीने आज ११ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता शहरातील न.प.मराठी शाळेच्या प्रांगणात जागर समतेचा हा काव्य, नाटय, संगीतमय आंबेडकरी शाहिरी जलसाचे आयोजन करण्यात आले आहे. निर्मित आटर्स प्रस्तुत या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.नरेंद्र लोणारे राहतील तर उदघाटक म्हणुन उमेश फुले उपस्थित राहतील.



या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ.निखिल पवार, ओमप्रकाश दुपारे, डॉ.रणधीर घोरपडे, राजकुमार फुसे, दीपक दुपारे, मदन तायवाडे, रवी पंचभाई, नरेंद्र कर्णासे, विलास दुपारे, गजानन ब्राह्मणे, डॉ.चंद्रशेखर बासुंदे, सुखदेव पखाले, डॉ.सम्यक घोरपडे, सुशील बेले, डॉ.सचिन रामटेके, नगरसेविका भाग्यश्री अधव आदी प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित राहतील.

या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन समता पर्व संयोजन समिती अध्यक्ष संजय घोरपडे व पदाधिकाऱ्यांनी एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.


## श्री स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त

# विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरूड** – श्री स्वामी समर्थ सेवा व बालसंस्कार केंद्र (डिंडोरी प्रणीत) शाखा वरुड यांच्या वतीने श्री स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त अखंड नाम जप यज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक सप्ताह ८ ते १५ एप्रिल २०२६ दरम्यान भक्ति भावात पार पडणार आहे.

या सप्ताहात श्री गुरुचरित्र महापारायण, सामुदायिक गुरुचरित्र वाचन, विविध धार्मिक विधी तसेच आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असुन भाविक, भक्त, सेवेकरी, बंधु-भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



सप्ताहाच्या कालावधीत दररोज सकाळी औदुंबर प्रदक्षिणा, गुरुचरित्र वाचन, नित्यस्वाहाकार, नैवेद्य आरती तसेच संध्याकाळी विविध धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत. यामध्ये गणेशयाग, मनोबोध योग, चंडी याग, स्वामी याग, गीतायज्ञ, रुद्रयाग आणि महायज्ञ यांचा समावेश आहे.

१५ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता महाआरती होणार असुन सायंकाळी ६.३० वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. संपुर्ण सप्ताहात श्री स्वामी समर्थ मंत्र जप, भजन, कीर्तन व आध्यात्मिक मार्गदर्शनही केले जाणार आहे. शिक्षण, नोकरी, व्यवसाय, विवाह, आरोग्य व इतर वैयक्तिक समस्यांवर मार्गदर्शन मिळणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

हा कार्यक्रम श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, साई श्रद्धा कॉलनी येथे होणार असुन अधिक माहितीसाठी ८८३०८२७६८९, ८००७९२९७३१, ७०६६८४९२४४, ९५०३८१५६१६ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# डिजिटल प्रणालीवर आधारित लोकाभिमुख प्रशासन निर्माण करण्यावर प्रशासनाचा भर : पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

## अमरावती शहर पोलीस दलाच्या ताफ्यात ३० नवीन वाहने दाखल

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते लोकार्पण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





***अमरावती*** – शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक लोकाभिमुख आणि वेगवान करण्यासाठी शासन कटिबद्ध असून, अमरावती शहर पोलीस दलाच्या कार्यक्षमतेत वाढ व्हावी या उद्देशाने जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून ३० नवीन अत्याधुनिक वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. अमरावती शहर हे राज्याचे महत्त्वाचे शैक्षणिक आणि सांस्कृतिक केंद्र असून, वाढत्या शहरीकरणानुसार सुरक्षिततेचे आव्हान पेलण्यासाठी शासन डिजिटल प्रणालीवर आधारित आणि लोकाभिमुख प्रशासन निर्माण करण्यावर भर देत आहे. ही नवीन अत्याधुनिक वाहने यात महत्त्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी व्यक्त केला.

शहरातील कायदा आणि सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी तसेच गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी अमरावती शहर पोलीस दलाच्या ताफ्यात ३० नवीन अत्याधुनिक वाहने दाखल झाली आहेत. या वाहनांचे लोकार्पण आज पोलीस आयुक्त कार्यालयात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते संपन्न झाले. अमरावती शहर पोलीस दलाची कार्यक्षमता वाढवण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून या ३० नवीन वाहनांची खरेदी करण्यात आली आहे. या वाहनांमुळे पोलिसांना गुन्ह्यांच्या ठिकाणी तत्परतेने पोहोचणे आणि गस्त घालणे अधिक सुलभ होणार आहे. या सोहळ्याला आमदार संजय खोडके, सुलभा खोडके, राजेश वानखडे, महापौर श्रीचंद तेजवानी, प्रवीण पोटे-पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री बावनकुळे म्हणाले की, अमरावती शहर हे शिक्षणाचे, संस्कृतीचे केंद्र आहे. येथे गुंतवणूकदार मोठ्या प्रमाणावर आकर्षित होत आहेत. बदलत्या काळानुसार गुन्हेगारीचे स्वरूप बदलत असून सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. हे आव्हान पेलण्यासाठी शासन डिजिटल प्रणालीवर आधारित आणि लोकाभिमुख प्रशासन निर्माण करण्यावर भर देत आहे. शहर अधिक सुरक्षित करण्यासाठी संपूर्ण अमरावतीत सीसीटीव्ही सर्वेलन्सचे जाळे विणले जाईल. यामुळे अवैध धंदे करणारे समाजकंटकांवर चाप बसणार आहे.

पोलिसांनी संवेदनशील ठिकाणांची यादी तयार करून तिथे विशेष बंदोबस्त ठेवावा. तसेच, 'पोलीस मित्र' संकल्पना राबवून सुरक्षिततेचा आढावा घ्यावा. महामार्गावर गोवंश तस्करी रोखण्यासाठी सुरक्षा वाढवण्याचे आणि रात्रीच्या वेळी दुचाकीवरून गोंधळ घालणाऱ्यांवर कडक कारवाई करा. प्रसारमाध्यमे ही समाजाचा आरसा आहेत. प्रसारमाध्यामंमध्ये प्रसारीत होणाऱ्या बातम्यांवर त्वरित कार्यवाही करा. बातम्यांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती प्रसारमाध्यमांना द्या, असे निर्देश पालकमंत्री बावनकुळे त्यांनी यावेळी दिले.

# लसीचा सीड स्ट्रेन विकण्याचा प्रस्ताव रद्द करा : जयंत पाटील यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – डीपीटी (घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात) लसीचा सीड स्ट्रेन खासगी कंपनीला विकण्याचा प्रस्ताव तत्काळ रद्द करण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून केली आहे.

मुंबईच्या हाफकिन बायो फार्मास्युटिकल कॉर्पोरेशनचे लसीकरणात फार मोठे योगदान आहे. डीपीटी लसीचे उत्पादन करण्याची क्षमता हाफकिनकडे आहे. ही अत्यंत दुर्मिळ जैव संपत्ती असून तिचे बाजारमूल्य हजारो कोटी रुपयांच्या घरात आहे.

मात्र रिलायन्स लाइफ सायन्स या खासगी कंपनीने ही सीड स्ट्रेन व्यावसायिक अटींवर विकत घेण्याचा प्रस्ताव दिल्यानंतर शासन पातळीवर लगेचच विक्री-प्रक्रिया सुरू झाल्याचे दिसते, याकडे पाटील यांनी सरकारचे लक्ष वेधले आहे. एका खासगी कंपनीच्या मागणीवरून अशी मौल्यवान जैव संपत्तीची विक्री प्रक्रिया सुरू होणे हे अत्यंत चिंताजनक आहे. ज्यांच्या नावाने ही संस्था उभी आहे, ते महान शास्त्रज्ञ वाल्देमर हाफकीन यांनी मानवतेच्या सेवेसाठी लसी विकसित केल्या. त्यांनी आपल्या संशोधनावर कोणतेही पेटंट घेतले नाही.

# गुरुवर्य स्व.अंबादासपंत वैद्य मार्गाचे लोकार्पण, कुस्ती मॅट वितरण

## श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या विकासासाठी कटिबद्ध : पालकमंत्री बावनकुळे

(प्रतिनीधी वरुड दर्पण)






***अमरावती*** – गुरुवर्य स्वर्गीय अंबादासपंत वैद्य यांनी सन १९१४ मध्ये स्थापन केलेले श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ आजही राष्ट्रहिताच्या विचारावर अग्रेसर आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन संस्थेतून आंतरराष्ट्रीय खेळाडू घडले आहेत. पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांचे समर्पित कार्य आणि व्यक्तिमत्त्वाचे महत्व लक्षात घेता सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहोत, असे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

गांधी चौक ते ओसवाल भवन मार्गाचे गुरुवर्य स्व. अंबादासपंत वैद्य मार्ग असे नामकरण करण्यात आले आहे. या निमित्ताने नामफलकाचे लोकार्पण, तसेच कुस्ती मॅट वितरण सोहळा शुक्रवार, दि. १० एप्रिल रोजी पार पडला. मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य अध्यक्षस्थानी होते. पालकमंत्री बावनकुळे यांच्या हस्ते फलकाचे उद्घाटन, तसेच कुस्ती मॅटचे पूजन करण्यात आले. यावेळी मंडळाच्या वतीने पालकमंत्री बावनकुळे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला आमदार प्रविण तायडे, राजेश वानखडे, इतर मागासवर्ग आयोगाच्या सदस्य किरण महल्ले, अचलपूरच्या नगराध्यक्षा रुपाली माथने, प्रवीण पोटे, राजेश देशमुख, किरण पातुरकर, मंडळाचे उपाध्यक्ष डॉ.श्रीकांत चेंडके, सचिव प्रा. डॉ.माधुरी चेंडके, डॉ.संजय तिरथकर, सुनील खराटे उपस्थित होते. प्रा.डॉ.माधुरी चेंडके यांनी प्रास्ताविक केले. डॉ.विजय पांडे आणि आशीष हटेकर यांनी सूत्रसंचालन केले.

# आता क्लीनरशिवाय ट्रक धावणार! सरकारचा महत्त्वपूर्ण निर्णय : 'ड्रायव्हर असिस्ट सिस्टिम' बंधनकारक, तंत्रज्ञानाच्या वापरामुळे दंडाच्या जाचातून सुटका

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई :-** राज्यातील जड वाहन (एचएमव्ही) चालकांसाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला असून, वर्षानुवर्षे सुरू असलेली क्लीनरची अनिवार्य अट अखेर रद्द करण्यात आली आहे. याऐवजी आता वाहनांमध्ये तंत्रज्ञानावर आधारित पर्यायांचा वापर करण्यास परवानगी देण्यात आली आहे. 'मोटार वाहन कायदा, १९८८' अंतर्गत ८ एप्रिल रोजी यासंदर्भातील राजपत्र प्रसिद्ध करण्यात आले असून, यामुळे ट्रकचालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

'महाराष्ट्र मोटार वाहन (पहिली सुधारणा) नियम, २०२६' नुसार, जर जड वाहनांमध्ये 'ड्रायव्हर असिस्ट सिस्टिम' बसवलेली असेल, तर क्लीनरची आवश्यकता भासणार नाही. या प्रणालीत ३६०-डिग्री कॅमेरा, ब्लाइंड-स्पॉट मॉनिटरिंग आणि ऑडिओ-व्हिज्युअल प्रॉक्सिमिटी अलर्ट यांसारख्या आधुनिक सुविधांचा समावेश असणे आवश्यक आहे. आतापर्यंत क्लीनर नसल्यास दररोज १,५०० रुपये दंड आकारला जात असे. एकाच प्रवासात अनेकवेळा दंड भरवा लागत असल्याने ट्रान्सपोर्ट क्षेत्रातून यावर तीव्र टीका होत होती.


### जाहीर नोटीस

## तहसिलदार मोर्शी यांचे न्यायालयात

**रा.मा.क्र./४८/MRC - ८१/वऱ्हा/२०२५-२६**

**तहलिदार मोर्शी यांचे न्यायालयात, ता.मोर्शी, जि.अमरावती**

**जाहीरनामा :-**

या कार्यालयाचे ज्ञापनाव्दारे कळविण्यात येते की, **अर्जदार रेखाबाई मोतीराम भोंडे, रा.वाडेगांव, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी त्यांचे आई नामे लिलाबाई शेषरावजी घुलक्षे मृत्यूची नोंद ग्रामपंचायत **वऱ्हा** ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केले आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक **ग्रा.पं.वऱ्हा,** येथिल जन्म/मृत्यू नोंदवही अनुउपलब्धता प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत.

त्या अर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयच्या असेल त्यांनी, सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन **१५ दिवसाचे आत** लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदती नंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतींचा विचार करण्यात येणार नाही यांची नोंद घ्यावी.

**दि.०६/०४/२०२६**

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार मोर्शी**

### जाहीर नोटीस

## तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**क्र.प्रस्तु-१/कावी-५७/२०२६ दि.०९/०४/२०२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **प्रतिक सुभाष दंडाळे रा.कुरळी** यांनी **ग्रामपंचायत कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे प्रतिक सुभाष दंडाळे, यांचा जन्म दि.०३/०२/२०००** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदर्हू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **०९/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्रीमती जे.एस.ठाकरे, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.३०३/२०२६ ने.ता.०८/०६/२०२६**

**अर्जदार :-**

इंदिरा अभिमान फुले

वय अं.५३ वर्ष, धंदा-घरकाम

रा.रोषनखेडा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत कमला पांडुरंग कुकडे, रा.रोषनखेडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०८/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०८/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील आय.जे.ठाकरे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.२७१/२०२६ ने.ता.१०/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) धनराज गोविंदराव देशमुख, वय अं.५८ वर्ष, धंदा-शेती, २) रंगराव गोविंदराव देशमुख, वय अं.५४ वर्ष, धंदा- शेती, क्र.१ व २ रा.चांदस (वाठोडा), ता.वरुड, ३) नंदा राजेंद्र गावंडे, वय अं.५४ वर्ष, धंदा- घरकाम, रा.खडका ता.वरुड, ४) प्रतिभा राजेंद्र सोनारे, वय अं.५१ वर्ष, धंदा-घरकाम, रा.रामजीबाबा नगर मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत पंजाब गोविंदराव खुशालराव देशमुख व मयत शेवंताबाई गोविंदराव देशमुख, रा.चांदस (वाठोडा), ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१०/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०७/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# भाड्याच्या परवडणाऱ्या घरांसाठी पोर्टल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – मुंबईमध्ये नोकरी, व्यवसायानिमित्त बाहेरून मोठ्या संख्येने नागरिक येत असतात. त्यांच्याकरिता मोठ्या प्रमाणावर घरांची आवश्यकता असल्याने भाडे तत्त्वावरील परवडणाऱ्या घरांसाठी सक्षम यंत्रणा उभारून कार्यान्वित करावी तसेच भाडे तत्त्वावरील परवडणाऱ्या घरांसाठी नागरिकांच्या सुविधांकरिता पोर्टल विकसित करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुंबईसह अन्य महानगरांमध्ये नोकरी, व्यवसायनिमित्त आलेल्या नागरिकांसाठी परवडणाऱ्या दरात भाडेतत्त्वावरील घरे असली पाहिजेत. मागणीनुसार पुरवठा या तत्त्वावर भाडेतत्त्वाने घरे उपलब्ध होतील, याची काळजी घेण्यात यावी. घरांसाठी मागण्यांसंदर्भातील करारानुसार सर्व कार्यवाही होईल, याबाबतही यंत्रणेने दक्षता घेतली पाहिजे. उपलब्ध असलेल्या भाडेतत्त्वावरील घरांबाबत यंत्रणेने समन्वयाने कार्यवाही केल्यास मालक व भाडेकरू या दोघांनाही अडचण येणार नाही, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. बैठकीला गृहनिर्माण विभागाचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, पोलीस आयुक्त देवेन भारती, गृह विभागाचे प्रधान सचिव अनुपकुमार सिंह, राधिका रस्तोगी, विधी व न्याय विभागाचे प्रधान सचिव दिलीप घुमरे, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल आदी उपस्थित होते. १०० विशेष न्यायालये स्थापन करा महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ अंमलबजावणीच्या सक्षमीकरण व सुलभीकरणाबाबत मुख्यमंत्री म्हणाले, या कायद्यांतर्गत सक्षम प्राधिकारी म्हणून पोलीस उपायुक्त यांना नियुक्त करावे. पोलीस ठाणे अथवा पोलिसांचे परिक्षेत्र वाढल्यास त्यानुसार आपोआप सक्षम अधिकारी वाढतील, अशी व्यवस्था करावी. पोलीस उपायुक्तांच्या कामकाज यादीमध्ये सक्षम प्राधिकारी म्हणून काम पाहण्याच्या कामकाजाचा समावेश करण्यासाठी अधिसूचना काढण्याची कार्यवाही करावी. भाडेदर संदर्भातील न्यायालयीन प्रकरणे निकाली काढण्यासाठी १०० विशेष न्यायालये स्थापन करावी. यासाठी सेवानिवृत्त न्यायाधीशांची नियुक्ती करावी.

# अवैध दारु विक्रेत्यांना बेनोडाच्या ठाणेदारांचे पाठबळ

## लोणीच्या ग्रामस्थांचा आरोप : गृहराज्य मंत्री पंकज भोयर यांना निवेदन

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – तालुक्यातील लोणी येथे राजरोसपणे सुरु असलेल्या अवैध गावठी विषारी दारु विक्रीमुळे गावातील तरुण पिढी उध्वस्त होत आहे. या गंभीर प्रकाराकडे लक्ष वेधण्यासाठी गेलेल्या प्रशासक समितीच्या सदस्यांना बेनोडा पोलिस स्टेशनचे ठाणेदार विवेक देशमुख यांनी अपमानास्पद वागणुक देत दालनातुन हाकलुन लावल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पोलिसांच्या या भूमिकेमुळे 'रक्षकच भक्षक' बनले आहेत का? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

राज्याचे गृहराज्य मंत्री पंकज भोयर याना पाठविलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे



की, लोणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसमोर आणि आठवडी बाजार परिसरात अवैध दारुची विक्री जोरात सुरु आहे.

या विषारी दारुमुळे गेल्या वर्षभरात गावातील सुमारे १० ते १२ तरुणांना आपला जीव गमवावा लागला आहे. अनेक कुटुंबे उघड्यावर आली आहेत. ही अवैध विक्री कायमस्वरुपी बंद व्हावी, या साठी ग्रामस्थांनी वारंवार पोलिस प्रशासनाकडे पत्रव्यवहार केला आहे. ९ एप्रिल २०२६ रोजी प्रशासक समितीचे सदस्य या संदर्भात निवेदन देण्यासाठी बेनोडा पोलिस स्टेशनला गेले होते. मात्र ठाणेदार विवेक देशमुख यांनी समितीचे म्हणणे ऐकुन न घेता उलट त्यांनाच कायद्याची भीती दाखवुन मोठ्या आवाजात धमकावले. इतकेच नव्हे तर यापुर्वी ग्रामपंचायत कर्मचारी निवेदन घेऊन गेले असता अश्लिल भाषेत ठाणेदारांनी त्यांना तंबी दिल्याचे निवेदनात म्हटले आहे.

अवैध धंदे चालविणाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी तक्रारदारांनाच धमकावल्या जात असल्याने हे सर्व अवैध व्यवसाय ठाणेदारांच्या संगनमतानेच सुरु असल्याचा संशय प्रशासक समितीने व्यक्त केला आहे. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी प्रशासक अश्विनी दवंडे, प्रशासक समिती सदस्य रविकांत तिखे, जयश्री टेंभे, सीमा मालपे, जोत्सना ठाकरे, दिनेश गुल्हाने, वनिता गडलिंग, अरुणा धुर्वे, प्रकाश सनेसर, चेतन खोडस्कर, धिरज अंबाडकर, प्रांजली पाटील, अश्विनी काळे, आकाश पापडकर, उमा गुल्हाने, अविनाश सोनारे, ताराचंद फुटाणे यांच्या वतीने गृहराज्य मंत्री पंकज भोयर यांना निवेदन देण्यात आले आहे. गावात दारु विक्री त्वरित बंद न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा लोणी ग्रामस्थांनी दिला आहे.

# कॉलेजला गेलेली मुलगी बेपत्ता

## अज्ञातावर पळवुन नेल्याचा गुन्हा दाखल

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – शहरातील राजुरा नाका, फासेपुरा येथील एक तरुणी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात मुलीच्या वडिलांच्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांची मुलगी स्थानिक महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. ८ एप्रिल रोजी ती नेहमीप्रमाणे सकाळी कॉलेजला जाते असे सांगुन घरातुन बाहेर पडली. साधारणपणे सायंकाळी ५ वाजेपर्यंत ती घरी परतते मात्र त्या दिवशी सायंकाळी ६ वाजेपर्यंत ती घरी न पोहोचल्याने कुटुंबीयांनी तिची वाट पाहिली.

बऱ्याच वेळ होऊनही मुलगी न आल्याने वडिलांनी आजूबाजूच्या परिसरात, नातेवाईकांकडे आणि तिच्या मैत्रिणींकडे चौकशी केली. मात्र तिचा कुठेही पत्ता लागला नाही. मुलीच्या अजाणतेपणाचा फायदा घेऊन कोणीतरी अज्ञात इसमाने तिला फुस लावुन पळवुन नेले असावे, अशी खात्री पटल्यानंतर वडिलांनी वरुड पोलिस स्टेशन गाठुन तक्रार दिली.

या प्रकरणी फिर्यादी यांच्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द भादंवि १३७ (२) बिएनएस २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार अर्जुन ठोसरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरुड पोलिस करीत आहे.

# समृद्धी महामार्गावर नेक्सॉन, इनोव्हा, औरा कारचा विचित्र अपघात, मदतीला धावलेल्या कर्मचाऱ्यांनाही दुखापत, २ गंभीर, ५ जखमी



■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** –समृद्धी महामार्गावर अपघातांची, काल सायंकाळी बुलढाण्याच्या मेहकरजवळ एक भीषण तिहेरी अपघात घडला. पहिल्या अपघातानंतर मदतीसाठी धावलेल्या समृद्धी महामार्गाच्या कर्मचाऱ्यांनाच पाठीमागून येणाऱ्या भरधाव वाहनाने धडक दिली. या विचित्र अपघातात २ जण गंभीर जखमी झाले असून ५ जण किरकोळ जखमी आहेत. नेक्सॉन कारच्या धडकेने अपघाताची सुरुवात मुंबई कॉरिडॉरवरील चॅनेल क्रमांक २९३ जवळ हा अपघात घडला. मिळालेल्या माहितीनुसार, एका नेक्सॉन कारने आपल्या समोरील अज्ञात वाहनाला जोराची धडक दिली. या पहिल्या धडकेत नेक्सॉन चालक शशांक खेरणार हे गंभीर जखमी झाले. घटनेची भीषणता पाहून महामार्गावरील सुरक्षा रक्षक आणि मदत पथक तातडीने तिथे पोहोचले.

# किरकोळ कारणावरुन महिलेला मारहाण

## आमपेंड येथील घटना : तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – किरकोळ कारणावरुन झालेल्या वादातुन एका ३२ वर्षीय महिलेला लाकडी काठीने मारहाण केल्याची घटना आमपेंड येथे घडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास सुरु आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी गजानन सोभाराम मंगरोले (३२), मोतीराम छतरसिंग मंगरोले (३५) आणि विक्रम छतरसिंग मंगरोले (३२), सर्व रा.आमपेंड, यांनी संगनमत करुन फिर्यादी नीलिमा संतोष वरठी (३२), रा.आमपेंड, ता.वरुड यांना विनाकारण शिवीगाळ केली. वादाचे रुपांतर हाणामारीत झाले असता आरोपींनी लाकडी काठीने त्यांना मारहाण केली तसेच पुन्हा मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणी फिर्यादी नीलिमा संतोष वरठी (३२), रा.आमपेंड, ता.वरुड यांच्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी आरोपी गजानन सोभाराम मंगरोले (३२), मोतीराम छतरसिंग मंगरोले (३५) आणि विक्रम छतरसिंग मंगरोले (३२), सर्व रा.आमपेंड, यांचेविरुध्द कलम ११८, १, ३५२, ३५१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार अर्जुन ठोसरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरुड पोलिस करीत आहे.

